Recd.on.
22 Aug'07.

परिपत्रक :

क्र.विवागुण/७९०७/०६-०७/(६७)/
का-४,
क्रीडा व युवक सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
दिनांक :-

3 AUG 2007

प्रति,
सचिव,
महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, मुंबई-२८
..................................

विषय :- इ.१० वी व १२ वी मध्ये प्रविष्ठ होणा-या राज्य, राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळत असलेल्या विद्यार्थ्यांना वाढीव गुण देण्याबाबत.

संदर्भ :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचे पत्र क्र.एसएससी-२००२/(१०४/०२)उमाशि-२, दि.०४ जून,२००४.

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) या परीक्षांना सर्व विषय घेऊन प्रविष्ठ होणा-या नियमित खेळाडू (राज्य, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त क्रीडा स्पर्धात सहभागी होणा-या) विद्यार्थ्यांना एकूण गुणांमध्ये २५ गुण दर्शवून उत्तीर्णतेसाठी व गुणांची टक्केवारी वाढविण्यासाठी या वाढीव गुणांचा उपयोग करण्यास खालील अटींच्या अधीन राहून २५ वाढीव गुण देण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

(१) सर्व विषयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सदर २५ गुण खेळाडू विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत दाखविण्यात यावे. एकूण गुणात हे गुण दर्शवून उत्तीर्णता व टक्केवारी वाढविण्यासाठी या गुणांचा उपयोग करावा. (उदा. ३५० गुण + २५ गुण = ३७५ गुण)

(२) अनुत्तीर्ण खेळाडू विद्यार्थ्यांना आजच्या प्रचलित पध्दतीने २५ गुण देण्यात यावेत आणि अनुत्तीर्ण खेळाडू विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी असणा-या आवश्यक गुणांव्यतिरिक्त उर्वरित गुण त्यास मिळालेल्या गुणात वरीलप्रमाणे दर्शवावेत.

(३) विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात (१ जून ते ३१ मे) क्रीडा प्रकारात सहभागी झालेला असावा.

(४) खेळाडू विद्यार्थ्यास सवलतीचे २५ गुण दिल्यानंतर त्याची टक्केवारी अधिकतम १००% असेल.

(५) राज्य/राष्ट्रीय/आंतराष्ट्रीय स्तरावर क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने मान्य केलेल्या संस्था व क्रीडा प्रकारासाठी हे गुण अनुज्ञेय राहतील.

(६) खेळाडू विद्यार्थी एकापेक्षा अधिक खेळांत (राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय) स्तरावर सहभागी झाला तरीही कमाल २५ गुणच देण्यात यावेत.

(७) मंडळाच्या प्रचलित नियमांनुसार सदर क्रीडा प्रकाराच्या वैधतेबाबत नियम असावेत.

तरी आपल्या संघटनेमार्फत आयोजित करण्यात येणा-या अधिकृत राज्य/राष्ट्रीय/आंतराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव गुण मिळण्याच्या दृष्टीकोणातून त्या त्या वर्षामध्ये दि. ०१ जून ते ३१ मे या कालावधीतच करण्यात यावे.

(स्थळप्रत मा.संचालकांनी
मान्य केली आहे.)

( आर.पी.कापडणीस )
प्र.सहसंचालक,
क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.

........